**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण**
Maharashtra Housing & Area Development Authority
**जनसंपर्क विभाग**
कक्ष क्र. १९/२०, तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर,
वांद्रे पूर्व, मुंबई - ४०००५१. दू. क्र. :- ०२२ ६६४०५०७७,
६६४०५०६६ ई मेल - cpromhada@gmail.com

=====================================================================

जावक क्रमांक –४९३६ / ७३ दिनांक :- २३ नोव्हेंबर, २०२३

प्रसिद्धिपत्रक

## म्हाडा कोंकण मंडळाच्या विरार-बोळींज प्रकल्पाला सूर्या प्रकल्पातून पाणीपुरवठा सुरू

२२७७ पैकी शेवटच्या घराची विक्री होईपर्यंत विरार-बोळींज येथील सदनिकांसाठी अर्ज सादर करणे व स्वीकृती प्रक्रिया सुरूच राहणार

मुंबई, दि.२३ नोव्हेंबर, २०२३:- मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीएने) सूर्या प्रादेशिक पाणीपुरवठा प्रकल्पातून वसई-विरार महानगर पालिकेला पाणी पुरवठा सुरू केला असल्याने म्हाडाच्या कोंकण मंडळाच्या अखत्यारीतील विरार-बोळींज येथील गृहनिर्माण प्रकल्पाला नियमित पाणी पुरवठा सुरू होण्यास सुरवात झाली आहे. यामुळे विरार-बोळींज येथील २२७७ सदनिकांच्या विक्रीसाठी जाहीर संगणकीय सोडतीसाठी अर्ज करण्याकरिता अर्जदारांना प्रोत्साहन मिळणार असून यापूर्वीच्या सोडतीत सदनिकांचा ताबा घेतलेल्या २३८४ सदनिका धारकांना दिलासा मिळाला आहे. पाणीपुरवठा सुरू झाल्याने विरार-बोळींज येथील घरांसाठी अधिकाधिक अर्ज प्राप्त होण्याची मंडळाला अपेक्षा असून २२७७ पैकी शेवटच्या घराची विक्री होईपर्यंत विरार-बोळींज येथील सदनिकांसाठी अर्ज सादर करणे व स्वीकृती प्रक्रिया सुरूच ठेवण्याचा निर्णय मंडळाने घेतला आहे.

मंडळातर्फे जाहीर करण्यात आलेल्या सोडतीत विरार-बोळींज येथील प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या योजनेअंतर्गत २२७७ सदनिका विक्रीसाठी उपलब्ध आहेत. प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य योजनेतील विरार-बोळींज प्रकल्पातील सदनिका घेऊ इच्छिनाऱ्या अर्जदारांकरिता मंडळातर्फे उत्पन्नाची अट शिथिल करण्यात आली असून अर्जदाराने उत्पन्नाचा कुठलाही पुरावा सादर करणे गरजेचे नाही. अर्ज करण्यासाठी अर्जदाराचे आधारकार्ड व पॅन कार्ड आवश्यक असून अर्जदार विवाहित असल्यास पती व पत्नी दोघांचे आधारकार्ड, पॅन कार्ड लागणार आहे. एक अर्जदार या प्रकल्पात एकापेक्षा अधिक सदनिकांकरीता अर्ज करू शकतात. या सर्व इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त (OC received) असून रेडी टू मुव्ह स्वरुपातील मालमत्ता आहे. अर्जदारांनी विक्री किंमत भरल्यावर दोन आठवड्यात ताबा दिला जाणार आहे.

विस्तृत ४१ एकरवरील या प्रकल्पाबाबत अधिक माहितीसाठी म्हाडाच्या ०२२ ६९४६८१०० या २४ तास कार्यरत हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन मंडळातर्फे करण्यात आले आहे. या योजनेतील शेवटची सदनिका विकली जाईपर्यंत नोंदणीकरण आणि अर्ज भरणा प्रक्रिया सुरू राहील. तसेच प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या योजनेत सहभाग घेण्याकरिता https://lottery.mhada.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी व अर्ज भरण्याचे आवाहन मंडळातर्फे करण्यात आले आहे. अनामत रक्कम भरणा व

परतावा संबंधित सुविधेकरिता इंडियन बँकेच्या ७०६६०४७२१४ व ९५२९४८५७८० या कॉल सेंटर हेल्पलाइन वर संपर्क साधण्याचे आवाहन मंडळातर्फे करण्यात आले आहे.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / प्राधिकरण